९३०२२

जा. क्र. प्रा/प्राशि/जिप-खाप्राशा/पीआर
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक : 15 NOV 1999

ज्ञानदीप विद्या मंदिर
आ. क्र. २४/९९-२०००
दि. १८/११/९९
तळवडे

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे - ११

विषय : खाजगी भाडेदराचा दाखला
ज्ञानदीप विद्या मंदीर, लक्ष्मीनगर, तळवडे, ता. हवेली.

संदर्भ : आपल्या कार्यालयाकडील जा. क्र. जिप/शिक्षण/प्राथ
२२१/३५८/९९, दि. ३०.६.९९.

वरील विषयासंबंधीचे आपले कार्यालयाकडील संदर्भाधीन पत्र पहावे.

२/- आपल्या वरील पत्रान्वये आपण ज्ञानदीप विद्या मंदीर लक्ष्मीनगर, तळवडे या खाजगी प्राथमिक शाळेचा भाडे मंजूरीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावाची छाननी, शासन निर्णय दि. २५.२.९९ नुसार निर्माण करण्यात आलेल्या कार्यबळ गटाच्या दि. १५.१०.९९ च्या बैठकीमध्ये करण्यात आली. कार्यबळ गटाने शाळेस दरमहा रक्कम रु. ३,४९५/- [रु. तीन हजार चारशे पंच्याण्णव दरमहा फक्त] इतकी रक्कम मंजूर करण्यास मान्यता दिलेली आहे. तरी ज्ञानदीप विद्या मंदीर, लक्ष्मीनगर, तळवडे या शाळेस दरमहा रु. ३,४९५/- भाडे आकारणीस मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मधील नियम क्र. ११५ नुसार मंजूरी देण्यात येत आहे. मात्र हे भाडे स्वतंत्रपणे मंजूर नसून मान्य बाबींवरील एकूण खर्चाच्या ८४ प्रमाणे जी रक्कम देय होईल त्याचे मर्यादित राहील याची नोंद घ्यावी.

स्थळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक
यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १ करिता.

प्रत :
मुख्याध्यापक
ज्ञानदीप विद्या मंदीर, तळवडे, ता. हवेली,
जि. पुणे.